# 'काळाशी सुसंगत संशोधन हवे'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'ताज्या घडामोडींवरील कालसुसंगत संशोधनाची आज मोठ्या प्रमाणावर गरज आहे. मात्र, आपल्याकडील शिक्षणसंस्था परकीय शिक्षणपद्धतीनुसार संशोधन करत आहेत. नोटाबंदी, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, मुद्रा योजना, अटल टिंकरिंग लॅब, स्वच्छतागृहांची योजना आदी गोष्टींचा जनमानसावर मोठा प्रभाव पडत आहे. त्यावर आधारित संशोधनाची आवश्यकता असून विद्यापीठांनी, शैक्षणिक संस्थांनी त्यावर भर द्यायला हवा,' असे प्रकाश जावडेकर यांनी सांगितले. त्याचबरोबर जावडेकर यांनी सरकारच्या जवळपास सर्वच योजनांची माहिती देत या योजनांचा प्रसारही केला.



नियामक संस्था या त्या अंतर्गत येणाऱ्या संस्थांसाठी अडचणी निर्माण करणाऱ्या संस्था नसाव्यात, तर या संस्था त्यांना सहकार्य करणाऱ्या असाव्यात, असे सरकारचे धोरण आहे. त्यासाठीच या नियामक संस्थांच्या कार्यपद्धतीत बदलाचा निर्णय घेतला आहे.

– प्रकाश जावडेकर,
केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री

### 'एनी व्हेअर लर्निंग'ला प्रतिसाद

संशोधनाशिवाय प्रगती अशक्य आहे. संशोधनात भारत मागे आहे. या गोष्टी लक्षात घेऊन एटीएमच्या धर्तीवर एनी व्हेअर लर्निंगची सुविधा ऑनलाइन-ऑफलाइन माध्यमातून उपलब्ध करून दिली आहे. त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असून देशाच्या विकासाला हातभार लागत आहे, अशी माहिती जावडेकर यांनी दिली.